श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १३ ] पौष, माघ व फाल्गुन [ अंक ११.१२ व १३

शके १८५८

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवितमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र रामकृष्ण सामंत

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| श्रीसाईभक्त काव्यसुमनें ... ... ... | १—३ |
| अनुभव ... ... ... ... | ४—६ |
| श्रीसाईभक्तांस थोडा अधिक खुलासा ... ... | ७—१३ |
| प्रस्तावना ... ... ... ... ... | १४—१८ |
| नानासाहेबाख्यान ... ... ... ... | १९—३६ |
| आढावे ... ... ... ... | ३७—३९ |


## वाचकांस विनंती

शके १८५८ चे अंक श्रीसाईकृपेने कसेबसे कां होईना एकदांचे पुरे केले आहेत. शके १८५९ च्या अंकांना लौकरच सुरवात होणार आहे. पण सर्वारंभाः स्तंडुलः प्रस्थमूलः या न्यायानें साईभक्त आपापली लीलेची-वर्गणी मनिऑर्डरीनें खालील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करतीलच. असें केल्यानें व्ही. पी. ची विनाकारण मेहनत व खर्च संस्थेवर पडणार नाहीं. एके काळीं लीलेच्या वर्गणीदारांची संख्या १००० च्या आसपास होती. ती आतां बरीच रोडावली आहे. गेल्या खेपेला आम्ही ४०० भक्तांना लीला पाठविली होती. त्यांतील सुमारें १०० भक्तांनीं आपणास लीला नको, असें कळविलें आहे. कमींत कमी ३०० वर्गणीदारांच्या आश्रयाविना लीला नेहमींप्रमाणें चालू राहणें शक्य नाहीं.

**रा. रा. सामंत**
४५ टर्नर रोड, वांद्रें ( मुंबई २० )

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमच्याकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.—**प्रकाशक**


कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर अथवा अण्णासाहेब दाभोळकर कृत **श्रीसाईसच्चरित** किं. रु. ३॥

Shri Sai Baba of Shirdi (A Glimpse of Indian Spirituality) in English, by Rao Bahadur M. W. Pradhan, Price Re. 1.



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदकपार्श्वता योजनैकं ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

शके १८५८] श्रीसद्गुरु साईनाथ [वर्ष १३, अंक ११,१२ व १३.

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

# श्रीसाईभक्त काव्यसुमनें

( एका साईभक्ताकडून )

( १ )

( राग—कालिंगडा  ता. दीपचंदी )

हमतो शरण चरणमें तुम्हारे, साई शिरडीके रहनेवाले ॥ धृ० ॥
तुमको कहते बाबासाई, सबको अघटित माया दिखाई ॥
तुमने पानीसे दीपक उजाले, साई शिरडीके रहनेवाले ॥ १ ॥
साई अजब है तुम्हारी रचना, सुधरा रोगी अभक्त दिवाना ॥
अपने भक्तोंके भवबंध खोले, साई शिरडीके रहनेवाले ॥ २ ॥
तुमको शरण जो कोई आया, उसका सबही दुःख मिटाया ॥
आपने बच्चोंके तरह संभाले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ३ ॥
कभी छोडा न आपना ठिकाना, फिरभी घटघटकी बातोंका जाना ॥
अपने सेवक चुनचुनके निकाले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ४ ॥
सुनो, सुनलो अर्जी हमारी, हमको हैराण करते षड्वैरी ॥
भक्तीरसके पिलादो प्याले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ५ ॥
विष्णुदास कहे बाबा साई, मांगू सद्गुरुसेवा मिठाई ॥
तुमहो स्वामी दयालू अकेले, साई शिरडीके रहनेवाले ॥ ६ ॥

## ( २ )

### गझल ( चाल—कालुबलामें में )

कोइ मुझे दिखादो सद्गुरू साई शिरडीके साई ॥ धृ० ॥
कोइ कहे उनको अल्ला, कोई कहे साई मौला ॥
कोइ कहे दत्तगुरू बाबा साई शिरडीके साई ॥ १ ॥
किसने देखा साई राम, किसने सांई हनुमान ॥
किसने देखा शंभू ध्यान, बाबा साई शिरडीके साई ॥ २ ॥
विष्णुदास कहे अब मैं कहां कहां देखूं ॥
जहां जहां देखूंवहां बाबा शिरडीके साई ॥ ३ ॥

## ( ३ )

### झोपडी ( चाल—आनंद कंद ऐसा )

भूपानजीं महालीं । सौख्यें कधीं मिळालीं । तीं येथ प्राप्त झालीं ।
या झोपडींत माझ्या ॥ १ ॥
पहारे आणि तिजोऱ्या । त्यांतून होती चोऱ्या । दारास नाहीं दोऱ्या ।
या झोपडींत माझ्या ॥ २ ॥
महाला समोर आला । खडे रहो हा शब्द झाला । मज्जाव नसे कुणाला ।
या झोपडींत माझ्या ॥ ३ ॥
महालीं कधीं कुणाला । विश्राम तो जिवाला । आराम हो मनाला ।
या झोपडींत माझ्या ॥ ४ ॥
भूमीवरी पडावें । ताऱ्याकडे पहावें । प्रभुनाम नित्य गावें ।
या झोपडींत माझ्या ॥ ५ ॥
येतां तसे तुम्ही या । जातां तसे सुखें जा । कोणावरी न बोजा ।
या झोपडींत माझ्या ॥ ६ ॥
पाहोनि सौख्य माझें । देवेंद्रताहि लाजे । तृप्ती सदा विराजे ।
या झोपडींत माझ्या ॥ ७ ॥
दासा मती ही द्यावी । साई पदीं रमावी । शांती सदा वसावी ।
या झोपडींत माझ्या ॥ ८ ॥

## ( १ )

## शार्दूलविक्रीडित

( श्री. स. ह. परांजपे, ३५१ सदाशिव पेठ यांजकडून, )

रक्षाया सुजनास ताप हरुनी त्यांना जगीं होय जो।
दुष्टा दंड करून तत्पर सदा स्थापावया धर्म जो।
घेतो जन्म युगांमधें वचन हें गीतेमधें बोलला।
साईरूप धरून कृष्ण शिरडी ग्रामामधें राहिला ॥ १ ॥
अंगी कौपिन शीर्ष बंधन तशी दाढी हनूचे वरी।
दृष्टी उग्र तशीच दिव्य वसते कांती शरीरावरी।
ऐसें रूप धरी अशास्तव दिसे तो म्लेंछ जातींतला।
साई रूप धरून कृष्ण शिरडी ग्रामामधें राहिला ॥ २ ॥
राही तो शिरडीस दूर बहु ती गोदावरी साइला।
होती संन्निध ये परी जल तिचें साईपदा निर्मला।
दृष्टी पाट दिसे परी कलियुगीं गोदाच ने आपुला।
साईरूप धरून कृष्ण शिरडी ग्रामामधें राहिला ॥ ३ ॥
पृथ्वी आप तसेंच तेज सगळीं तत्त्वें जया किन्नर।
सांगे त्या अगदींच मुक्त बनती ते भक्त रोगी जर।
अग्नी तप्त असा प्रसाद ढवळी हस्तेंच साई भला।
साईरूप धरून कृष्ण शिरडी ग्रामामधें राहिला ॥ ४ ॥
कोणी भक्त जरी पुसे नमुनियां गीतामृतातें मला—।
सांगा स्पष्ट करून अर्थ सगळा बाबा अहो चांगला ॥
सांगे तो सगळेंच मर्म कथिलें गीतेमधें त्याजला।
साईरूप धरून कृष्ण शिरडी ग्रामामधें राहिला ॥ ५ ॥
गीता ये यवना जयें नच कधीं जी वाचिली पाहिली।
हें आश्चर्य जना गमें मनुज ती मूर्ती जयें मानिली ॥
थोडासा करितां विचार उमजे लावून ही भक्तिला।
साईरूप धरून कृष्ण शिरडी ग्रामामधें राहिला ॥ ६ ॥
राहे पांच तपें सुमार शिरडी खेड्यामधें दूरसा।
नाना बाळ तसेंच भक्त जन जे जाती तया योग्यसा।
सांगे जो उपदेश भक्त सुजना संतुष्ट ठेवी मन।
त्या बाबा चरणीं सदाशिव करी अत्यल्प हे वंदन ॥ ७ ॥

श्रीबाबासेवक लक्ष्मीतनय

# अनुभव

Kasiibai Hansraj
Husband Hansraj.
Caste Vani.
Age about 45.
Residence Sakori

2-12-1936.
Sakori.

Says.

I and my husband went to Shirdi 20 years ago. In Margasira about December 1916, just after Radhakrishna Ayi died, we went and stayed for about 6 months. My husband had Asthma. Narasinga Baba Maharaj of Nasik had told him that as an evil spirit was obsessing his body, we got no issue and that he should go to Shirdi Sai Baba who would give him two slaps and exorcise it. That is why we come to Sai Baba. Baba gave my husband 2 slaps saying "EVIL SPIRIT BE OFF." From that time we lived there. My husband's Asthma abated. It was operating during the day but did not trouble him at night. Before we came to Shirdi, it troubled him day and night. Baba was coughing away at night, when we lived there. At the end of our 6 months stay, Asthma ceased to trouble him by day even. Before I mention that, a chamatkar and Baba's part in healing him have to be mentioned. Soon after we settled here, Baba told my husband that he should be strict about his diet and avoid curds, and other acid and pungent articles of food. When it came to acting on this advice, my husband found it hard to follow it, as these were what he liked most. He did not relish his food without curds &c.,

He would sooner give up life than curds, he declared. So every day for 2 months we were trying to prepare curds at home, for in this villae curds are not easily to be had at noon. We kept milk heated and cooled for curdling every night and then we would go and attend the Noon-Arathi of Baba at the Mosque. Everyday almost for 2 months a cat would steal into our lodgings in our absence, jump up the sling in which the curdpot was kept and drink the curds. As our meal had to be after Arati, my husband found that there were no curds to take. One day he resolved to catch the feline thief in the very act and so stayed away from the Noon Arati. The cat came in. My husband allowed it to get in, to watch how it could possibly reach the curdpot which was kept so high in a sling. But it did. Anyhow the cat had dipped its mouth into the curdpot and the curds were not fit for use. He quietly watched its drinking and when it got down he used his stick severely on its back, by way of summary punishment for its larceny. In the afternoon, people resorted to Baba at the mosque and got udhi from his hands. We went there. Jog, Madhav Rao Deshpande, Kaka Dixit, Buty &c., were there. Baba addressing them referred to my husband and said "There is an ऊफांट्या cursed contriry man" (i. e. one who does the reverse of what he is asked to do) who wants to die by eating sour and pungent things. But I would not allow him to do that. Today I went to him in the form of a cat. That fellow has given me a caning on the back. See here." Then Baba exposed his back from under the KUPNI; and there we could see a weal or stripe such as caning might cause. What a wonder !

Thereafter my husband wanted no more curds to be prepared and no more acids &c., to take. This accelerated his improvement very probably. Baba was not for giving him any medicines. First I give my husband daily some medicine for the Asthma. Baba then said that he also had Asthma and that as I was giving medicine to my husband he had thousands of women who would give him medicine. " But what is the use ?" He added " Allah Malik hai, God is the Lord." So I stopped giving medicines. It is without resort to any medicine that Baba got my husband's Asthma cured.

Sai Baba used to say many things. I remember some. While he was all along living at Shirdi alone, he would suddenly declare " I have been to Kasi and had a bath and just now I have returned. Why do I want a bath here ?" or "I have been to Kolhapur, or Audumbar wadi and I have just now returned."

Bapu Saheb Jog told me that Sai Baba gave him darsan of himself as Akkalkote Maharaj, at his ( Jog's ) request.

# श्रीसाईभक्तांस थोडा अधिक खुलासा

## लेखांक २ रा

मागील अंकीं आम्ही " साईभक्तांस विज्ञप्ति " या सदराखालीं श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या कारभाराविषयीं थोडा खुलासा दिला होता. आतां येथें मूळपासूनची माहिती देत आहों. या अंकांत दुसरीकडे कै. श्री. अण्णासाहेब दाभोळकर हे श्रीसाईचरणीं ता. १५ जुलई १९२९ रोजीं विलीन झाल्यानंतर त्याचे वारस व पुत्र श्री. गजानन गोविंदराव दाभोळकर यांजकडून श्रीशिरडी संस्थानचें दप्तर व रोकड वगैरे पावल्याबद्दल श्रीशिरडी संस्थानच्या विश्वस्तांची एक, तसेंच त्यांच्या तर्फे संस्थानचे तत्कालिन खजीनदार यांच्या सहीची अशा दोन पावत्या छापल्या आहेत. श्रीशिरडी संस्थान कमिटी सन १९२२ सालीं स्थापन होऊन कै. श्री. दाभोळकर हे कमिटीच्या स्थापनेपासून ते तहत ता. १५।७।२९ पर्यंत तिचे खजीनदार होते. सदर मुदतींत आरंभापासून ते ता. ५ जुलई १९२६ पर्यंत कै.श्री. काकासाहेब दीक्षित हे संस्थानचे चिटणीस असून त्यांच्यानंतर श्री. गोविंद काशीनाथ गाडगीळ बॅरिस्टर हे चिटणीस होते.

सोबत छापलेल्या सदरील पावत्यांवरून दिसून येतें कीं, कै.श्री. अण्णासाहेब दाभोळकर यांच्या निधनसमयीं संस्थानची रोकड शिलकेची स्थिति खालीलप्रमाणें होतीः—

| रु. आ. पै. | |
|---|---|
| १५,७१८–१–२ | सरकारी रोखे दर्शनी किंमत २१,१०० रुपयांचे. |
| ३,०००–०–० | म्युनिसिपल डिबेंचर्स दर्शनी किंमत (किंमत उपलब्ध नाहीं) |
| ७,५२२–८–६ | पोस्टल कॅश सर्टिफिकिटें दर्शनी किंमत १०,००० रुपयांचीं. |
| १००–०–० | मराठा प्राव्हिडंट फंडाचे २ शेअर्स, प्रत्येकीं ५० रुपयांचे. |
| ५३०-१४-२ | इं. बँक सेव्हिंग बँक बुकांत. |
| ७०६–९–३ | रोख कोठी कीर्दीप्रमाणें. |
| ३०३–०–६ | रोख कायम फंड कीर्दीप्रमाणें. |
| ४१४–८–० | रोख श्रीपुण्यतिथी कीर्दीप्रमाणें. |
| २८,२९५–९–७ | |

याखेरीज कै. श्री. चिन्चणकर ट्रस्ट फंडास रु. १४३१–१०–६ कर्ज व रु. ४३–११–९ उसनवार येणेप्रमाणें रकमा गुंतलेल्या होत्या.

वर दिलेल्या रकमांपैकीं आजमितीपर्यंत रु. १५,७१८–१–२ चे सरकारी कर्जरोखे द. किं. रु. २१,१०० व रु. १००–०–० मराठा प्राव्हिडंट फंडाचे २ शेअर्स एकूण रु. १५८१८–१–२ या दोन रकमा मूळ स्थितींत आहेत सदर दोन रकमांशिवाय कै. श्री. दाभोळकर यांच्या हातच्या कै. श्री. तर्खड माजी खजीनदार यांच्या हातीं आलेल्या नक्त रकमा येणेप्रमाणें आहेतः—

रु. आ. पै.

३०००–०–० म्युनिसिपल डिबेंचर्सचें विक्रीनें.

१२७५–०–० पोस्टल कॅश सर्टिफिकिटें वटविल्यानें, ता, २०।१।३०.

५८३–३–९ इं. बँक सेव्हिंग बँक पास बुकांतून व्याज सुद्धां.

७०६–९–३ कोठी कीर्दीतील रोख.

३०३–०–६ कायम फंड कीर्दीतील रोख.

४१४–८–० श्री पुण्यतिथी कीर्दीतील रोख.

* { ५००–०–० कै. बाबरे मिळकतीवरील रु. २१००चे कर्जांतील मुदलापैकीं वसूल ता. २६।९।३१
८००–०–० ,, ,, ,, २२।१।३१
४३–११–९ ,, ,, उसनवार रकमेपैकीं,, २२।२।३१
२०९–१०–६ ,, रु. २१००चें कर्जापैकीं मुद्दल बाकी ,, सन १९३५ मध्यें
४१०–४–० ,, ,, कर्जाचें संपूर्ण व्याज ,, ,, }

१६२४५–१५–९ एकूण रुपये हातीं आले ते

येणें प्रमाणें रु. १६२४५–१५–९ कै. श्री. तर्खड यानीं सन १९०००१च्या ३½% च्या सरकारी कर्जरोख्यांत अतिशय किफायत भावानें गुंतविले त्याची विगत खालीं दिली आहे.

* टीप—सदर बाबरे मिळकतींतील आंकडे व तारखा श्रीसाईलीला वर्ष १३ अंक ४–५–६, पृष्ठ २० पुढें पत्रक नं. १ ते ४ वरून घेतले आहेत.

| गुंतविली रक्कम | दर्शनी किंमत | तारीख |
|---|---|---|
| रु. आ. पै. | | |
| २१७१-३-९ | ३३००-०-० | २६।९।३० |
| ७९८-९-३ | १२००-०-० | १०।१०।३० |
| ९९५४-४-३ | १५८००-०-० | ३०।१०।३० |
| ४४८-६-० | ७००-०-० | ,, |
| १०००-१२-१० | १५००-०-० | ७।११।३० |
| १५७५-१०-२ | २५००-०-० | ९।३।३१ |
| २५३-२-० | ३००-०-० | १९।१।३४ |
| १६२०२-०-३ | २५३००-०-० | |

यावरून दिसून येईल कीं, कै. श्री. अण्णासाहेब दाभोळकर यांच्या वेळची शिल्लक खालील रीतीनें कायम फंडांत गुतविली आहे.

| शिल्लक रु. आ. पै. चे | दर्शनी किंमत रु. चे | सरकारी रोखे |
|---|---|---|
| १५७१८-१-२ | २११०००-०-० | कै. श्री. दाभोळकर यानीं स्वतः घेतलेले |
| १६२०२-०-३ चे | २५३००-०-० चे | कै. श्री. तर्खड यांनीं दाभोळकरांच्या वेळच्या पैशांतून खरेदी केले ते |

एकूण ३११२०-१-५ रु.चे ४६४००-०-० रु. दर्शनी किंमतीचे सरकारी कर्जरोखे व रु. १०० चे मराठा प्राव्हिडंट फंडांचे दोन शेअर्स हे कै.श्री.दाभोळकर यांच्या वेळचे आहेत.

—संपादक

## श्रीसाईबाबा

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे विश्वस्त यांनीं कै. श्री. अण्णासाहेब दाभोळकर ( माजी खजीनदार ) यांच्या चिरंजीवास लिहिलेल्या इंग्रजी पत्राचा तर्जुमा.

" श्री. गजानन गोविंदराव दाभोळकर,

साईनिवास, ५ सेंट मार्टिनचा रस्ता, वांद्रें.

प्रिय महाराज,

आम्ही खालीं सह्या करणार श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे विश्वस्त ( ट्रस्टीज ) आपण ता. २-९-२९ तारखेचें आम्हा सर्वांस पाठविलेलें पत्र

पोहोंचल्याचें नमूद करितों. त्याचे उत्तरादाखल आम्ही आपणास या लेखानें खालीं लिहिल्याप्रमाणें कळवीत आहोंत.

२ आपण सोबत जोडलेल्या क्रमांक १ च्या यादीमध्यें तपशीलवार लिहिल्याप्रमाणें श्रीशिरडी संस्थानचे कर्जरोखे, रोकड रक्कम व दस्तैवज इत्यादि जिनसा सदर संस्थानचे खजीनदार श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांच्या हवालीं करण्याची मेहेरबानी करावी.

३ शिवाय आपण सोबत दिलेल्या क्रमांक २ च्या यादींतील तपशिलाप्रमाणें सदर संस्थानच्या दप्तरचे सर्व कागदपत्र संस्थानचे वर उल्लेखिलेले खजीनदार यांजपाशीं देण्याची कृपा करावी.

४ आपले वडील कै. श्री. गो. र. दाभोळकर यांनीं बँकेंत सुरक्षित ठेवण्यासाठीं एकंदर चोवीस हजार एकशें ( रु. २४१००-०-० ) रुपयांच्या दर्शनी किंमतीच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा व म्युनिसिपल डिबेंचरें सदर संस्थानचे एक विश्वस्त श्री. ल. ग. महाजनी यांच्या स्वाधीन यापूर्वीच केलेलीं आहेत.

५ आम्ही वरील कलमें २ व ३ यांत नमूद केलेल्या वस्तूंचा ताबा घेण्याविषयीं संस्थानचे खजीनदार श्री. रा. आ. तर्खड यांस कळविलें आहे.

६ या बाबतींत श्री. तर्खड यांनीं आपणास याअन्वयें दिलेली कोणतीही पावती आम्हांस बंधनकारक राहील. वरील कलमें २ व ३ यांतील आमच्या निर्देशाप्रमाणें आपण वर्तन केल्याबरोबर आम्ही आपणास वरील कलमें २, ३ व ४ यांत दर्शविलेल्या देवघेवींच्या बाबतींतील कोणत्याही कसल्याही जबाबदारींतून मोकळे करीत आहोंत.

(सही) ल. ग. महाजनी, २४।९।२९
,, ग. गो. नरके, २४।९।२९
,, तात्याजी गणपतराव पाटील कोते, ता. २६।९।२९
,, मोरेश्वर वि. प्रधान, २८।९।२९
,, रा. आ. तर्खड
श्री. गो. र. दाभोळकर यांचे मृत्युसमयींचे विश्वस्त १।१०।२९

———:x:———

श्रीसाईनाथ प्रसन्न

# क्रमांक १ ची यादी

दर्शनी किंमत रुपये दहा हजारचीं ( रु. १००००-०-० ) पोस्टाचीं कॅश सर्टिफिकिटें, प्रत्येकीं रुपये एक हजारचीं ( रु. १०००-०-० ), श्री. मो. र. दाभोळकर व श्री. र. भा. पुरंदरे यांच्या नांवचीं, वांद्रें पोस्ट ऑफिसांत नोंदलेलीं, खालीं दिलेले क्रमांक त्यांजवर असलेलीं:—

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ए<br>ए ए | १८४२५ | १५।१२।२५ |
| २ | ,, | १८४२६ | ,, |
| ३ | ,, | १८४२७ | ,, |
| ४ | ,, | १८४२८ | ,, |
| ५ | ,, | १८४२९ | ,, |
| ६ | ,, | १८४३० | ,, |
| ७ | डब्ल्यु. डब्ल्यु.<br>१ | ०८५६८ | १०।१।२७ |
| ८ | ए ए<br>ए | २३५०१ | १८।१२।२५ |
| ९ | ,, | २३५०२ | ,, |
| १० | डब्ल्यु डब्ल्यु<br>१ | ०८५६७ | १०।१।२७ |

२ मराठा प्रॉव्हिडंट फंड लिमिटेड, मुंबईचीं दोन शेअर सर्टिफिकिटें क्रमांक ६३ व १७६ दर्शविणारीं, दोन्ही शेअर्स 'श्रीसाईनाथ कायम फंडाचे विश्वस्त' यांच्या नांवें असलेलीं श्री. वसंतराव पी. पोतदार यांनीं देणगी दिलेलीं.

३ मराठी बक्षीसपत्र ता. २५ फेब्रुवारी १९२६ चें रु. ७-८-० चें जनरल स्टॅंप कागदावर लिहिलेलें व अहमदनगर जिल्ह्यांतील रहातें येथील सब रजिस्ट्रारचे कचेरींत नोंदलेलें, ता. २२ मे १९३६ रोजीं बुक नंबर १ चे १०७ वे व्हॉल्युमच्या ३१५ ते ३१७ पृष्ठांवर २९६ नंबरीं नोंदलेलें; सदर बक्षिसपत्र १ श्री.

केशव गोपाळ बुटी, २ श्री. गणपतराव गोपाळ बुटी ( अज्ञान पालन करणार केशवराव बुटी), ३ श्री. पूर्णचंद्र गोपाळ बुटी आणि ४ श्री. हरि सीताराम दीक्षित एकूण असामी चार यांनीं श्रीशिरडी संस्थानचे विश्वस्त १ श्री. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, २ श्री. लक्ष्मण गणेश महाजनी, ३ श्री. गणेश गोविंद नरके, ४ श्री. तात्या गणपतराव पाटील कोते व ५ श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांच्या नांवें शिरडी येथील गांवठणांतील जमीन व इमल्यांचें करून दिलेलें.

४ एक क्राउन छापाची वही ऐशीं पानांची वर फक्त १ ते ३९ अंक खरोखर घातलेली, मलपृष्ठावर शिरडी संस्थानचें शीर्षक असलेली, कर्जरोखे, कॅश-सर्टिफिकिटें, शेअर सर्टिफिकिटे, प्रॉमिसरी नोटा इत्यादींच्या नोंदीची.

५ इंपीरियल बँक ऑफ इंडिया, मुंबई, सँढर्स्ट रोड शाखेचें एक सेविंग बँक बुक, अकौंट नंबर ००४९४६, इंडेक्स नंबर जी. ३५५ ले. फो. ७२० चे श्री. गो. र. दाभोळकर व श्री. र. भा. पुरंदरे यांचे हिशेबाचे, यांजपैकीं कोणाही एकाला अगर यांजपैकीं हयात इसमाला आदा होणेचें, ता. ३०-४-२९ एप्रिल सन १९२९ रोजीं ठेव ठेवणाराच्या खातीं रु. ५३०-१४-२ रुपये पांचशेंतीस चौदा आणे दोन पै. शिल्लक जमा असलेले.

६ मराठी विसार पावती शंभर १००-०-० रुपयांची ता. ३१ मार्च १९२८ ची श्री. नंदराम शिवराम मारवाडी राहणार शिरडी यांनीं श्रीसाईबाबांचे शिरडी संस्थानचे विश्वस्त १ श्री. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, २ श्री. लक्ष्मण गणेश महाजनी, ३ श्री. प्रोफेसर गणेश गोविंद नरके, ४ रामचंद्र आत्माराम तर्खड व ५ श्री. तात्या गणपत पाटील कोते यांच्या नांवें लिहून दिलेली श्री. नागपूरकर बुटींच्या वाड्याचे पूर्वेकडील शिरडी येथील खुल्या बिल्डिंग प्लॉटची.

७ हातीं शिल्लक रोख रुपये ७०६-९-३ (सातशें सहा रुपये नऊ आणे तीन पै. मात्र) कै. श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचे हातचे कोठी कीर्दीत ता. १३ जुलई १९२९ रोजीं दर्शविल्याप्रमाणें.

८ हातीं शिल्लक नक्त रुपये ३०३-०-६ (तीनशें तीन रुपये सहा पै मात्र) कै. श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचे हातचे कायम फंड कीर्दीत ता। १३ जुलई १९२९ रोजीं दर्शविल्याप्रमाणें.

९ हातीं शिल्लक रुपये ४१४–८–० (चारशें चौदा रुपये आठ आणे) मात्र कै. श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांनीं लिहिलेल्या श्रीपुण्यतिथी कीर्दीत ता. १५ जानेवारी १९२९ रोजी नमूद असल्याप्रमाणें.

१० श्रीशिरडी संस्थानच्या सभांचें प्रोसिडिंग बुक पृष्ठ १ ते ५२२ चें, पैकीं पृष्ठ १ ते ३१७ पृष्ठ ४०० ते ४११ लिहिलेलीं, आणि पृष्ठ ३१८ ते ३९९ व पृष्ठ ४१२ ते ५२२ कोरीं असलेलें; शेवटल्या प्रोसिडिंगावर ता. २२ जुलई १९२९ रोजीं त्या वेळेचे सभेचे अध्यक्ष श्री. के. एस्. डुबे यांनीं सही केलेलें.

११ एक लहान चांदीचें भांडें म्हणजे पातेली.

मला श्रीसाईबाबांचे श्रीशिरडी संस्थानचे सर्व विश्वस्तांचें वतीनें वरील यादी नंबर १ मध्यें अनुक्रमवार लिहिल्याप्रमाणें सर्व कर्जरोखे ( सिक्यूरिटीज ), रोकड दस्तैवज व वस्तु आज रोजीं पावल्या आहेत.

साक्षी

ए. के. कुळकर्णी १–१०–२९

व्ही. जे. खोत १–१०–२९

एक आण्याचे तिकिट

(सही.) रा. आ. तर्खड,
ऑनररी खजिनदार
श्रीशिरडी संस्थान

---

टीप—विस्तारभयास्तव यादी क्रमांक २ म्हणजे श्रीशिरडी संस्थानच्या कागदपत्रांची यादी येथें छापली नाहीं. सदर यादींत हिशेबांच्या वह्या, पत्रव्यवहाराच्या फायली, कीर्दी, खतावण्या, स्थळप्रतींचीं पावतीबुकें, पत्तेबुकें, वगैरे ५५ वह्या आहेत.

---

## श्रीसद्गुरुसाईनाथायनमः

ता. ९।९।१९३७

कृ. सा. न. वि. वि. पत्र लिहिण्यास कारण, मी विनायक असें कळवितों कीं, १। रुपया मनिऑर्डरीनें पाठविला आहे, त्याची हकीकत; माझी आजीबाई म्हणजे आईची आई, तिचें नांव गंगाभागीरथी आडेलकरीण बाय. हिच्या मुलाचा वंश नसल्यामुळें हिचा ठेवा १५ रुपये, माझ्याजवळ होता; तिचा असा दृष्टांत झाला कीं, ५ रुपये श्रीसाईबाबा शिर्डी यांच्या खजिन्यांत जमा करावे. त्यांपैकीं १। रुपया जमा करावा. बाकी मागाहून मिळतील तसतसे पाठवूं. अशी श्रीसाईबाबा शिर्डी समाधि यांच्याजवळ माझी विनंती आहे. हा तुमचा पत्ता वामन शांबा केसरकर यानें दिला. कळावें लोभ असावा हे विनंती.

पत्ता—संस्थान सावंतवाडी, मुक्काम बांदें, पोस्ट बाजारांत

विनायक ऊर्फ राघोबा रामचंद्र तेंडले

# श्रीदत्तचित्सासद्गुरुभ्योनमः

## प्रस्तावना

पूज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ति कानीं नायकावी ॥
हा अमुका ऐसी नोहावी । से चि लोकां ॥

**श्री. ज्ञा. अ. १३, ओं. १८८**

ढोंपर ढोंपर खळ्या पडून वीत वीत केर पडलेल्या पडक्या मोडक्या तोडक्या मशिदींत बसून नेहमीं चिलीम फुंकणाऱ्या, गांवांत दोनचार घरीं शिळ्या भाकरीचे तुकडे मागून खाणाऱ्या, अंगावर फाटकेतुटके कपडे घालणाऱ्या व ओंठावर मिसुर न फुटलेल्या अवघ्या १८–२० वर्षे वयाच्या बालजोगी फकिरास, हें निर्गुण परमात्माचे सगुणावतार संतरत्न प्रतीक आहे असें कोण ओळखणार !

तसेंच आपली लोकांत मानमान्यता व्हावी, आपली कीर्ति आपण कानांनीं ऐकावी, किंवा ही एक अमुक विभूति आहे असें जगाला ज्ञात व्हावें,अशी ज्यांना इच्छाच नाहीं,असे हे बालजोगी बाबा जे एकदां शिरडी-सारख्या मनुष्यांच्या गजबजीपासून व प्रवासाच्या नानाविध साधनांपासून दूर अशा अप्रसिद्ध, एकांतवासाच्या आपल्या गुरुरायाच्या समाधिसन्निध, कुग्रामांत येऊन राहिले, ते तेथून दुसरीकडे कोठेंही न जातां तेथेंच क्षेत्र-संन्यासी झाले. अशा वेडयाचें सोंग घेतलेल्या फकिराकडे येणार कोण व त्यांचें सूक्ष्म निरीक्षण करणार कोण ?

तथापि "न रत्नमन्विष्यति मृग्यतेहि तत्" या श्री कविकुलगुरु कालिदास यांच्या कुमारसंभवांतील प्रसिद्धोक्तीप्रमाणें रत्न कोणाला शोधावयास जात नाहीं. ज्याला जरूर असेल तो तें कोठेंही उकिरड्यांत पडलें असलें, तरी तेथें जाऊन त्याला हुडकून काढतो, या न्यायानें वर दर्शविलेल्या स्थितींत बाबांची अनुपमेय योग्यता, बाबांचा अलौकिक अधिकार, बाबांची अतुल शक्ति व अगम्य सत्ता लोकांच्या निदर्शनाला

आणण्याची, व त्यांचें अप्रतिम व्यवहारचातुर्य व त्यांची अमोल पारमार्थिक शिकवणूक लोकांना पटवून देण्याची उत्कृष्ट कामगिरी जर कोणी प्रथम केली असेल, तर ती भक्तशिरोमणि कै. नारायण गोविंद ऊर्फ नानासाहेब चांदोरकर यांनींच केली हें कोणीही कबूल करील.

परंतु बाबांनीं ज्या अनंत, असाधारण व अतर्क्य लीला केल्या, त्यांची इतर साधुसंतांच्या लीलाख्यानाप्रमाणें, कांहीं प्रत्यक्ष लीलानुभवांचीं आख्यानें तयार करून कीर्तनरूपानें जगतितलावर बाबांची आबालवृद्धांना माहिती करून देण्याचा आजवर प्रयत्न झाल्याचें दिसत नाहीं. तरी साधल्यास तसा अल्प प्रयत्न करून पाहावा या अत्यल्प बुद्धीनें श्रीएकनाथ-महाराज, श्रीदामाजीपंत वगैरे संतरत्नांच्या आख्यानाप्रमाणें बाबांचें हें एक लाहनसें आख्यान तयार केलें आहे. नानासाहेब चांदोरकर यांच्या मुलीची प्रसूति हा विषय आख्यानाकरितां घेतला आहे.

**पूर्वरंग**—अखिल विश्वांत हजारों भक्तांपैकीं केवळ परमात्म्याचीच प्राप्ति व्हावी असा प्रयत्न करणारा सद्भक्त एखादाच व असा प्रयत्न कर-णाऱ्या सद्भक्तांत सुद्धां परमात्मप्राप्ति किंवा परमात्म्याचें खरें ज्ञान झालें असा सद्भक्तही एखादाच.

परमात्म्याचें खरें ज्ञान होण्याला साधन भक्ति आहे. भक्ति अनेक प्रकारची आहे. ज्या भक्तीच्या योगानें परमात्मप्राप्ति होते, ती श्रीमद्भग-द्गीतेंतील चतुर्थ (ज्ञानी) भक्ति किंवा श्रीमद्भागवतांतील नववी (आत्मनिवेदन) भक्ति होय.

याप्रमाणें भक्ति केली, तरी सुद्धा खरें परमात्मज्ञान जसें एखाद्याच सद्भक्ताला प्राप्त होतें, तसेंच परमात्माला सुद्धां वासुदेवमय जगत् झालेला ज्ञानी महात्मा दुर्लभ असतो. असा एखादा सद्भक्त पुष्कळ जन्मांच्या शेवटीं परमात्मास प्राप्त होतो, व तसा भक्त परमात्मास मिळाला, म्हणजे ते त्याचें कौतुक करतात, त्याचें रक्षण करतात व नानाविध सोंगें किंवा रूपें घेऊन त्यांचीं संकटें दूर करतात. या पूर्वरंगाला धरूनच उत्तररंगाची योजना केली आहे.

**उत्तर रंग**—नानासाहेबांना बाबांचें पूर्ण ज्ञान झालें होतें व बाबांनीं नानासाहेबांना पूर्ण ओळखलें होतें. एकमेकांचें एकमेकांवर अलोट प्रेम असे. असो.

नानासाहेब खानदेशांत जामनेर तालुक्याचे मामलतदार असतांना तेथें त्यांनीं आपली कन्या बाळंतपणाकरितां आणिली होती. तिचे दिवस भरले असल्यामुळें तिचें पोट दुखूं लागलें. भयंकर कळा येऊं लागल्या. सुइणी व वैद्य थकले. कोणाचा कांहीं उपायही चालेना, व लवकर सुटकाही होईना. मुलीचे क्लेश. पाहून तुझें संकट दूर करण्यास सद्गुरु-चरणांवांचून दुसरा इलाज नाहीं व मला जर या वेळीं गुरुरायांची आरति व उदी मिळेल, तर मी यमधर्मालाही भीक घालणार नाहीं. तूं आतां बाबांच्या-वरच श्रद्धा ठेव असें तिला सांगून नानासाहेब स्वतः बाबांचा धांवा व नमन करूं लागले. इकडे नानासाहेबांचा धांवा व नमन ऐकून शिरडींत बाबांचें अंतःकरण कळवळलें. त्यांनीं लागलीच श्री. माधवराव देशपांडे यांना बोलावून आरति व उदी बापुगीर ( त्यांचें नांव रामगीर; पण बाबा त्यांना बापुगीर म्हणून हाक मारीत. ) गोसाव्याबरोबर ताबडतोब जामनेरास नानासाहेबांकडे रवाना करण्यास आज्ञा केली. इतक्यांत बापुगीर पण खानदेशांतच आपल्या गांवीं जाण्यासाठीं बाबांचा आशीर्वाद व बाबांची उदी मागण्याकरीतां व बाबांची आज्ञा घेण्याकरितां येथें आले. बाबांनीं त्यांना आशीर्वाद व उदी देऊन, आरति व उदी घेऊन प्रथम जामनेरीं जाऊन नानासाहेबांना ताबडतोब नेऊन देऊन नंतर आपल्या घरीं जाण्याची आज्ञा केली. जामनेरास आपणाला न पाठविण्याबद्दल बापुगिरांनीं बाबांच्या-जवळ बऱ्याच सबबी सांगितल्या. पण बाबांनीं त्या न मानतां, तुझी सर्व सोय वाटेंत होईल असें सांगून त्यांना जामनेरासच जावयास लाविलें.

शेवटीं बापुगिरांनीं कष्टानें शिरडी सोडली व ते आगगाडीनें जळगांव स्टेशनवर उतरले. स्टेशनचे बाहेर पाहतात तों तेथें गाडी नाहीं, घोडा नाहीं, तांगा नाहीं, भाजी नाहीं, पोळी नाहीं व जवळ दोन आण्यांपेक्षा

जास्त पैसेही नाहींत. तेव्हां तर त्यांची फारच धांदल उडाली. काळजी दुढावली. भूक लागली. इतक्यांत त्यांच्या कानावर एक ललकारी आली व आपलाच कोणी तरी तपास करीत आहे असें त्यांना वाटलें. तपास करतां जामनेरहून आपल्यास नेण्याकरितां मामलतदारसाहेबांनीं तांगा व शिपाई पाठविला आहे असें कळलें. बापुगिरांना आनंद झाला. बापुगीर नंतर, त्या टांग्यांत बसले. तांगा वायुवेगानें चालूं लागला. सुमारें अर्ध्या रस्त्यावर तांगेवाल्यानें जवळच एक पाण्याचा ओहोळ होता, तेथें तांगा उभा केला. त्यानें घोडयास पाणी पाजलें व स्वतःकरतां थोडेंसें पाणी आणून आपणही थोडा फराळ करूं असें बापुगीरांना सांगितलें. शिपायाच्या बोलीवरून व पेहेरावावरून हा शिपाई मुसलमान असावा व आपण याच्याबरोबर फराळ कसा करावा अशी शंका आल्यावरून बापुगिरांनीं शिपायाला त्याची जात विचारली. आपण हिंदु रजपूत आहों असें त्यानें सांगितल्यावर दोघांनींही तेथें फराळ केला. पुन्हा तांग्यांत बसून जामनेरास निघून गेले. तांगेवाल्यानें तांगा जामनेरास गांवाबाहेर मामलतदार कचेरीजवळ सोडला. बापुगीर खालीं उतरले. लघुशंकेस लागली, म्हणून ते जरा एका बाजूला गेले. परत येऊन पाहतात तों तेथें तांगा नाहीं, घोडे नाहींत व तांगेवालाही नाहीं. त्यांनीं पुष्कळ तपास केला. कशाचाच पत्ता लागेना. ते शेवटीं तपास करीत करीत नानासाहेबांच्या घरीं गेले. नानासाहेब वाटच पाहत उभे होते. बापूंनीं त्यांना आरति व उदी दिली. नानासाहेबांनीं लागलीच बाबांची आरति केली व उदी पाण्यांत घालून मुलीला पाजली. उदी पोटांत जातांच मुलगी प्रसूत होऊन जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला.

इतक्यांत, आपण तांगा व फराळाचें स्टेशनवर पाठविलेंत म्हणून मी इतक्या लवकर आलों, पण आश्चर्य हें कीं, मी लघ्वीला जाऊन परत येतों तों तो तांगा, ते घोडे व तो तांगेवाला कोठें नाहींसे झाले तें समजलें नाहीं. हे बापुगीरांचे शब्द ऐकल्याबरोबर आपण तर तांगा व शिपाई पाठविला नव्हता व फराळाचेंही पाठविलें नव्हतें असें असतां हें झालें कसें?

खात्रीनें हें त्या सद्गुरुमाउलीचेंच कृत्य असलें पाहिजे असें मनांत येऊन आपल्याकरितां बाबांना इतके कष्ट सोसावे लागले व इतका शीण झाला असें वाटून त्यांना दु:ख झालें. त्यांच्या ठिकाणीं अष्टसात्त्विक भाव उत्पन्न झाले. नेत्रांवाटे अश्रुधारा वाहूं लागल्या व आपलीं हीं उपकार-ऋणें मी कोठें फेडूं, मजसाठीं झालेल्या त्रासाची मला क्षमा करून मुलीचे क्लेश नाहींसे करून शेवटीं मला सौख्य दाखविलेत असें म्हणून नानासाहेबांनीं बाबांचें कौतुक केलें.

शेवटीं नाथांची सेवा करणारा श्रीखंडया, दामाजीपंतांची रसीद पोंचविणारा विठू महार व नानासाहेबांची आरति व उदी पोंचविणारा टांगा, टांगेवाला व घोडे हे सर्व एकच परमात्मा बाबा नव्हेत का अशी उत्प्रेक्षा घेऊन बाबांच्या दिव्य चरणीं नमन व याचना करून (उत्तर रंग) आख्यान संपविलें आहे.

या आख्यानाला कै. भक्तश्रेष्ठ अण्णासाहेब दाभोळकर कृत श्रीसाई-सच्चरितांतील ३३ व्या अध्यायाचा आधार घेतला आहे. श्री. बापुगीर (रामगीर) हे हल्लीं हयात असून त्यांचें वय जवळ जवळ ७५–८० वर्षांचें आहे. ते शिरडींतच राहतात. गांवांत भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. त्यांना कुटुंब, मूलबाळ वगैरे कोणी नाहीं. त्यांच्या वाचेवर अक्षय्य बाबांचें नांव नाचत असतें. त्यांना प्रत्यक्ष विचारून आख्यानांत लिहिलेली हकीकत खरी असल्याबद्दल मीं आपली खात्री करून घेतली आहे.

पूर्वरंग संपून, बुका लावण्याच्या वेळीं म्हणण्याकरितां जें पद ('ब्रह्म पाहिलें' या चालीवर) नं. १५ चें तयार केलें आहे, तें आपण कोठें कोठें, कशा कशा स्वरूपांत हिंडून शेवटीं कायमची वस्ती कोठें केली, याबद्दल बाबांनीं स्वमुखानें त्यांना जी हकीकत सांगितली, ती बापुगीरांनीं मला शिरडींत समक्ष सांगितल्यावरून तयार केलें आहे.

तसेंच बापुगीर जामनेरास गेल्यावर तेथें घडलेल्या हकीकतीबद्दल कै. नानासाहेबांचे थोरले चिरंजीव वासुदेव नारायण ऊर्फ बाबूराव चांदो-कर यांच्यकडूनही खात्री करून घेतली आहे.

ठाणें, गुरुवार, आषाढ शु. ६ } श्रीसाईपदरज दासानुदास<br>
शके १८५८; ता. २४–६–३६ } बालकृष्ण विश्वनाथ देव

श्रीदत्तचित्साईसद्गुरुभ्योनमः

# नानासाहेबाख्यान

## नमनम्

ॐ श्रीगणेशायनमः । स जयति सिंदुरवदनो देवोयत्पाद पंकज स्मरणं
वासरमणिरिव तमसां राशिं नाशयति विघ्नानाम् ॥

---

## नमन व प्रार्थना

१ पद ( 'रामदास माउली' या चालीवर )

दयाघन माउली । माय माझी दत्तराज माउली ॥
दत्तराज माउली । माय माझी ज्ञानराज माउली ॥
ज्ञानराज माउली । माय माझी साइराज माउली ॥
साइराज माउली । माय माझी दयाघन माउली ॥
लपुनि जगतीं सूत्र ओढिते । हलवि चराचर बाहुली ॥ माय ॥ १ ॥
भवभय तापें तप्त दास हा । करि करुणेची साउली ॥ माय ॥ २ ॥
काममदादिक गांजिति निशिदिनीं । दूर करी अहितावली[1] ॥ माय ॥ ३ ॥
दीन बाल तव नमुनि विनवी । ठाव देइं तव पाउलीं ॥ माय ॥ ४ ॥

———:o:———

## बाबांची सत्ता व बाळाची नम्र याचना

२ अभंग. ( 'गौरिशंकर पुजिला ज्यांनीं' या चालीवर )

शरण साई चरणीं गेला । त्यानें भवबंध तोडीला ॥ त्यानी ॥ धृ० ॥
हाणि काळासी तो लाथा । काळ ठेवी तत्पदीं माथा ॥ काळ ॥ १ ॥
ऐसा संतांचा अधिकार । साइ संतांचें सरकार ॥ साइ ॥ २ ॥
करूं सरकारा मूजरे । आपण चरणाचे हूजरे ॥ आपण ॥ ३ ॥
नलगे गुप्त मुक्ती ठेवा । अन्य भक्तांना तो द्यावा ॥ अन्य ॥ ४ ॥
बाल प्रार्थी नित्य मेवा । देइ तव पद भक्ती सेवा ॥ देइ ॥ ५ ॥

---

१ अहित=शत्रु, आवली=पंक्ती, समुदाय. अहितावली=शत्रुसमुदाय.

नामविषाचें मधुर रसायण बनवून कृपामृताच्या अनुपानासह, त्याचा एकच वळसा देऊन भवरोगहरण करण्याबद्दल बाबांची प्रार्थना.

३ पद. ( 'नाम तुझें बहु गोड' या चालीवर )

नाम तुझें विषभोग[1] । साई नाम तुझें विषभोग ॥ धृ० ॥
रस[2]ना ने घे वदे जह[3]र कटु । म्हणुनी होत वियोग ॥ साई ॥ १ ॥
सज्जन वदती नाम मधुर परि । मज कां ये न सुयोग ॥ साई ॥ २ ॥
वैद्य विषाचें बनवि रसायण । तैंचि कळे उपयोग ॥ साई ॥ ३ ॥
नाम विषाचें मधुर रसायण । करुनि दावि विनियोग ॥ साई ॥ ४ ॥
धन्वंतरि तूं अखिल जगाचा । सत्वरिं टाळि कुयोग ॥ साई ॥ ५ ॥
रसायणाचा एकचि वळ[4]सा । देउनि पाहि प्रयोग ॥ साई ॥ ६ ॥
कृपामृ[5]ताच्या अनुपानासह । झडकरि हरि भवरोग ॥ साई ॥ ७ ॥

:X:

टाळी महाराजः—साइनाथ गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ॥
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
साइनाथ ,, ,, ,, मजला ,, ,, ,,
श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्तमहाराज की जय.
,, ज्ञानेश्वर महाराज ,, ,,
,, साइनाथ महाराज ,, ,,
,, सर्व साधुसंत महाराज ,, ,,

---

१ विष घेण्यास जसें कठीण तसेंच तुझें नाम मुखीं येण्यास कठीण. पण विषाचें रसायण केलें म्हणजे तें जसें सुखकर, तसेंच तुझें नामाचें रसायण झालें म्हणजे त्याचा उपयोग घेण्यास सुखकर. २ जीभ. ३ विष. ४ पेढा. ५ कृपारूपी अमृताच्या अनुपानासह.

पूर्वरंगः—सद्भक्तांस सद्गुरु व सद्गुरूस सद्भक्त प्राप्तिदौर्लभ्य.

## पुनर्नमनम्.

### ४ स्त्रग्धरा वृत्तम्

दृष्ट्वा यद्ब्रह्मतेजः शुचि मधु रुचिरं शीतलं चित्तहारि ॥
पूर्णेंदुः क्षीण कांतिर्भवति किल तथा दर्पको नष्टदर्पः ॥
श्रुत्वा यत्प्रेमवीचीः प्रियजन विषये लज्जितो भाति सिंधुः ॥
तत्श्री साईपदाब्जे ममनतिततयः कोटिशः संतु नित्यम् ॥

**अर्थ**—ज्या साईपरमात्माचें शुद्ध, गोड, सुंदर, थंड व चित्तहरण करणारें ब्रह्मतेज पाहून, पौर्णिमेच्या चंद्राची कांति एकेक कलेनें कमी कमी होत जाते, तसेंच खरोखर मदनाचा गर्व नाहींसा होतो, तसेंच आपल्या भक्तजनांबद्दल प्रेमलहरी उसळलेल्या ऐकून समुद्र लज्जायमान झालेला दिसतो, अशा त्या श्रीसाईपदकमलाच्या ठिकाणीं माझ्या निरंतर कोटी प्रणामपंक्ति असोत.

---

केवल परमात्मप्राप्तीच्याच प्रयत्न करणारे भक्त थोडे व त्या प्रयत्न करणाऱ्या थोडया भक्तांत परमात्मप्राप्ति झाली असा भक्त विरळा.

### ५ अनुष्टुभ्.

मनुष्याणां सहस्त्रेषु । कश्चिद्यतति सिद्धये ॥
यतता मपि सिद्धानां । कश्चिन्मां वेत्ति तत्वतः ॥

श्री. भ. गी. अ. ७, श्लो. ३

**अर्थ**—हजारों मनुष्यांतून केवळ माझ्याच प्राप्तीकरितां प्रयत्न करणारा असा एखादाच भक्त निघतो व अशा तऱ्हेनें प्रयत्न करणाऱ्या सिद्धांमध्यें मला खरोखर जाणणारा असा विरळाच असतो.

### ६. वसंततिलका.

विश्वांतुनी सुदृढ शोधुनि एकएका । होई तयार चमु[१] लक्षवरी अनेका ॥
लक्षांतुनी समरिं[२] एकचि ती जयश्री[३] । शेखी[४] वरी[५] जशि वसंत ऋतू वनश्री[६] ॥

### ७. शार्दूलविक्रीडित.

एखादाचि उडी, जगांतुनि महा आस्थापुरीं टाकतो ॥
एखादाचि तयास्थिकांतुनि पर प्राप्ती तिरीं ठाकतो ॥
एखादाचि तसाच हिंमत धरी प्राप्त्यर्थ सायुज्यता ॥
प्राप्तार्थांतुनि एकलाचि विरला जाणे मला तत्व[१०] ता ॥

परमात्मा खरोखर कसे व केवढे आहेत हें जाणण्याचें साधन भक्ति.

---

१ सेवा. २ युद्धांत. ३ विजय. ४ शेवटीं. तसेंच (मागील पानावरून—५ माळ घालते. ६ वनशोभा. ७ कळकळ. ८ उभा राहतो. ९ चौथी मुक्ति. १० खरोखर.)

### ८. अनुष्टुप्.

**भक्त्या मामभिजानाति । यावान्यश्चास्मि तत्वत : ॥**

**ततो मां तत्वतो ज्ञात्वा । विशते तदनंतरम् ॥**

श्री. भ. गी. अ. १८ श्लो. ५५.

**अर्थ**—मी खरोखर केवढा व कसा आहें हें ( सद्भक्त ) भक्त मला भक्तीच्या ( चतुर्थज्ञानी ) योगानें जाणतो व मला खरोखर जाणून नंतर माझ्या ठिकाणीं प्रवेश करतो, म्हणजे माझ्याशीं एकरूप होतो.

**कोणती भक्ति.**

### ९. अनुष्टुप्.

**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी । ज्ञानीच भरतर्षभ ॥**

**तेषां ज्ञानी नित्ययुक्तः । एक भक्तिर्विशिष्यते ॥**

श्री. भ. गी. अ. ७, श्लो. १६--१७

**अर्थ**—( भक्त चार प्रकारचे आहेत ) आर्त ( पीडित ), जिज्ञासु ( जाणीवेच्छा असलेला), अर्थार्थी ( पैसा मिळण्याची इच्छा करणारा ) व चौथा ज्ञानी, जो माझ्याशीं अनन्य असून केवळ माझ्या प्राप्तीसाठींच भक्ति करणारा व तोच अत्यंत श्रेष्ठ आहे.

### १० अनुष्टुप्.

**श्रवणं कीर्तनं विष्णोः । स्मरणं पादसेवनम् ॥**

**अर्चनं वंदनं दास्यं । सख्यमात्म निवेदनम् ॥**

**—श्रीमद्भागवत**

### ११ साकी

**साधन एकचि चतुर्थ भक्ती कथिली कृष्ण प्रभुंनीं ॥**

**श्री भद्भगवद्गीतेमाजी तशीच नारद मुनिंनीं ॥**

**श्रीमद्भागवतीं । भक्ती नववी ती निरुती**

ज्ञानी महात्मा भक्त परमात्मास फार फार जन्मांनीं प्राप्त होतो.

### १२ अनुष्टुप्.

**बहूनां जन्मनामंते । ज्ञानवान्मां प्रपद्यते ।**

**वासुदेवः सर्वमिति । स महात्मा सुदुर्लभः ॥**

श्री. भ. गी. अ. ७, श्लो. १९

**अर्थ**—फार फार जन्मांनंतर मला ज्ञानी भक्त मिळतो. ज्याची सर्वत्र वासुदेवमय वृत्ति झाली असा ( ज्ञानी भक्त ) महात्मा ( मला ) मिळण्यास अत्यंत कठीण.

पायरीपायरीनें भक्तास ज्ञानी व महात्मपद कसें प्राप्त होतें व असा भक्त परमात्मास केव्हां प्राप्त होतो.

---

१ निश्चयानें.

### १३ दिंडी

गुप्त कामादि[1] श्वापदां[2] विषय[3] झाडीं। येइ चुकवनि सद्वासना पहाडीं॥
सारि[4] सत्कर्मे सरल[5] साधुसंगें। डावलूनी भव[6] रुक्मिणी रंगिं रंगे॥

### १४. पद ( 'उद्धवा शांतवन कर जा' या चालीवर )

कीरिटी अशा भजकाच्या। भाग्याला सीमा नसते॥
मुखचंद्र पाहुनी त्याचा। मोदाब्धिसि[8] भरती येते॥ धृ०॥
कर्मक्षय पाहट फुटते। गुरुकृपा उरवा[9] समुजळते[10]॥ १॥
कोंवळी बाल चिद्रविची[11]। सुप्रभा सुंदर पडते॥ २॥
साम्याची[12] ऋद्धी[13] खुलते। सर्वचि मी प्रतिती येते॥ ३॥
जल डोहिं आंत बाहेरीं। जलघटवत्तत्स्थिति होते॥ ४॥
चाल—वासुदेवमय जग वृत्ती। चिद्रत्न महात्मा विभुती॥
अति दुर्लभ दुर्लभ जगतीं। बहु बहु जन्मांतीं,
मज अशि मूर्ति मिळते। मूर्ति मिळते॥
जसें वीर रत्न[14] वीर मातेतें॥ किरिटी.॥ ५॥

———+———

| टाळी महाराज—दत्त | चिदीश्वर | साईराज। | विरिंचि | हरिहर | श्रीगणराज॥ |
|---|---|---|---|---|---|
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |
| ” | ” | ” | ” | ” | ” |

श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्त महाराज की जय
” ” ” ज्ञानेश्वर महाराज ” ”
” ” ” साईनाथ महाराज ” ”
” ” ” सर्व साधुसंत महाराज ” ”

---

१ काम क्रोध वगैरे ६ विकार. २ क्रूर प्राणी. ३ विषयरूप झाडींत ४ (अ.) करी. ४ उजू. ५ त्याग करून. ६ संसार. ७ पांडुरंग, कृष्ण. ८ मोद=आनंद अब्धि=समुद्र= आनंदसमुद्र. ९ उषा, प्रभात. १० उत्तम प्रकाश होतो. ११ चित्=ज्ञान. १२ ऐक्याची. ( किर्तनदेवतेला व कीर्तनकार बुवाला माळ घालणें व बुक्का लावणें व कथेला आलेल्या सर्व स्त्री-पुरुष-बाल जनांना बुका लावणें ) १३ समृद्धि १४ जगाला उद्धरणारा योद्धा.

१५ पद. ( 'ब्रह्म पाहिलें.' या चालीवर )

साइ कृष्ण वंदूं । अहाहा । साइ दत्त वंदूं ॥
स्थिरचर सकलहि उरे व्यापुनि । घटिं, पटिं, मठिं, हटिं भरे कोंदुनी ॥
सच्चित्सुख कंदू । अहाहा । सच्चित्सुख कंदू ॥ धृ० ॥
माहुरिं, गिरनारीं, अबु पहारीं । गाणगिं[3], अक्कलिं[4] दौलतिं[5] नगरीं ॥
करीत वस्ती त्या त्या भूवरी[6] । अनसूयानंदू । अहाहा । अनसूया नंदू ॥
दयाघन । अनसूयानंदू । कृपाघन । अनसूयानंदू ॥
स्थिरचर । घटिं पटिं । सच्चित्सुखकंदू । अहाहा । साइ कृष्ण ॥ १ ॥
आला पंढरिं उभा विटे वरी । शेखीं शिरडि–द्वारवती पुरीं ॥
राहुनि गोकुल–लीलाऽमितँ[7] करी । विठ्ठल गोविंदू । अहाहा ॥
दयाघन । कृपाघन । स्थिरचर ॥ २ ॥
बालभृंग[8] हा करुनी बंदी । ठेवो स्थिर तत्पदारविंदीं ।
पुरवो स्वादाशा[9] मकरंदीं[10] । नंदनृपानंदू । अहाहा ॥
दयाघन कृपाघन । स्थिरचर ॥ ३ ॥

## पूर्वरंग समाप्त.

# उत्तररंग आख्यान प्रारंभ.

### १६ शार्दूलविक्रीडित

### पुनर्नमनम्

घेई वेड पिसें, मशीदित बसे, लीन स्वरूपीं असे ॥
भिक्षा मागतसे, कथा कथितसे, ज्ञानोपदेशीतसे ॥
भक्तां रक्षितसे, जगीं फिरतसे, रूपें बहू घेतसे ॥
ऐशा प्रेमरसें, नमूं[11] मधुरसें,[12] त्या साइपं[13]त्सारसे ॥

कवाड हें क्षेत्र कां बनलें ?

### १७ आर्या.

ठाणें[14]–भिवंडी सन्निध[15] ग्राम असें लघु[16] कवाड या नांवें ॥
श्री कामोडि[17] तटीं जे संत निवासें चि क्षेत्रता पावे.

कवाड येथें कोणत्या संतानीं निवास केला ?

---

१ घरांत. २ बाजारांत. ३ गाणगापुरीं. ४ अक्कलकोटांत. ५ दौलताबादेंत
६ स्थळ, स्थान, ठिकाण. ७ अमित=असंख्य, अनंत, अगणित. ८ भुंगा. ९ स्वाद=चव रुचि+अशा=चव घेण्याची इच्छा. १० मधाचें. ११ आपण नमस्कार करूं. १२ गोड प्रेमानें. १३ पत्=पद (पाय) सारस=कमल=पदकमलाला. १४ ठाणें जिल्ह्यांतील भिवंडी गांवाजवळ. १५ जवळ. १६ लहान. १७ कामोडी नदी.

### १८ आर्या.

येथें शताब्द[1] पूर्वी संत सखाराम रत्न अवतरलें ॥
बाबांचे गुरु बंधू, यत्कृपया बहु मुमुक्षु सं तरले ॥

सखाराम महाराजांच्या भक्तांपैकीं एक सन्माननीय भक्त व त्यांचा अधिकार.

### १९ दिंडी.

भक्त त्यांचे गोविंदपंत[2] नाना । आडनांव किं चांदोरकर ज्यांना ॥
असे दप्तरदाराधिकार नामी[3] । वसंत[4] मोदें[5] कल्याण नाम ग्रामीं ॥

गोविंद पंतनानांचे चिरंजीव नानासाहेब, नानासाहेबांचे गुरु, व नानासाहेबांची गुरुभक्ति

### २०. स्रग्धरा

होते योग्याधिकारी[6], पदविधर[7], तयां[8] पुत्र साईश प्रेमी ॥
नानासाहेब ज्यांना, वदत, रत[9], सदा सद्गुरु नामिं धामीं[10] ॥
ज्यांची निस्सीम सेवा, सतत गुरुपदीं जाहली केक[11] वर्षे ॥
श्रीसाई मेघ राजा, तदुपरि [12]करुणा-वारि नित्य प्रवर्षे[13] ॥

खानदेशांत नानासाहेब मामलतदार असतांना घडलेला अद्भुत प्रकार.

### २१ ओवी.

असतां खानदेशीं [14]चांदोरकर । जामनेर तालुकीं मामलेदार ॥
घडला काय अद्भुत प्रकार । श्रोतीं सादर परिसावा ॥

नानासाहेबांनीं जामनेरास आपल्या मुलीस बाळंतपणाकरतां आणिली असतां तिच्या बाळंतपणाची झालेली दुःखद व चिंताजनक अवस्था.

### २२ पद ( " झाली ज्याची उपवर०" या चालीवर )

आणिली होती स्वकीय दुहिता । प्रसुतीसाठीं आपुल्या सदना ॥ धृ० ॥
दिन भरले, दुखूं पोट लागलें । आलें अति म्लानत्वचि वदना ॥ १ ॥
निघति कळा वरी कळा भयंकर । उपाय चाले नच तच्छ[15]मना ॥ २ ॥
सुइणी थकल्या वैद्यहि थकले । सुटका कशी ती क्षणीं होईना ॥ ३ ॥
होय घाबरी बोले बाला । वाटे जातील प्राणचि निघुना[16] ॥ ४ ॥

---

१ शत=१०० अब्द=वर्ष=शंभर वर्षें. २ डेप्युटी कलेक्टर (Personal assistant). ३ उत्तम. ४ राहत असत. ५ आनंदानें ६ मुमुक्षु. ७ बी. ए. ची पदवी धारण करणारे. ८ त्यांना ( गोविंदपंत नानांना ) ९ मग्न. १० घरीं=शिरडींत. ११ कित्येक. १२ करुणारूपी पाऊस. १३ पडे. १४ नानासाहेब. १५ थांबण्यास. १६ अहि=सर्प. शयन=निजणें=सर्पावर निजणारा=शेषशाई भगवान.

क्लेश किती तरी होती जिवाला[1] । जाणिव एका त्या अहिशयना ॥ ५ ॥

सुटेन कां हो, करी पदिं साची । यांतुन झडकरीं आई, नाना ॥ ६ ॥

नाना निगदति[2] नान्य[3] निवारी । संकट वांचुनि सग्दुरु चरणा ॥ ७ ॥

संकटकालीं सद्गुरूवर विश्वास ठेवण्यास नानासाहेब मुलीस सांगतात.

२३. पद. ( रागिणि–भैरवी. ताल–त्रिवट. 'या विरहा कां भीसी०' या चालीवर. )

काय करूं वेल्हाळे[4] । बाळे । काय करूं वेल्हाळे ॥ धृ० ॥

बघुनि तुझ्या ह्या प्रसववेदना । तशाच भीषण[5] भीम[8] यातना ॥
अमुचा जीव हळाळे ॥ काय करूं ॥ १ ॥

मिळेल जरि मज गुरुरायाची । पवित्र उदि आणि आरती साची ॥
ना, भी[6], मी, यम चाळे ॥ काय करूं ॥ २ ॥

क्लेश हराया तव गे देवी । समर्थ नच आम्ही श्रद्धा ठेवी ॥
साइपुढीं स्नेहाळे[7] ॥ काय करूं ॥ ३ ॥

संकटनिवारणार्थ नानासाहेब धांवा करतात.

२४ पद ( 'दाखवी तुझे दिव्य पाय०' या चालीवर)

मात, तात, नाथ, अगा, शिरडि–देवराया ॥
बालिकेशि क्लेश होति, येइ गा हराया ॥ धृ० ॥
मंत्र, तंत्र, औषधि मम, तूंचि दैव माया ॥
मांत्रिक मम वैद्यराज, नमन तुझ्या पाया ॥ १ ॥
तव चरणावीण शरण, जाउं कुण्या ठाया ॥
त्यजुनि कुणी मंदार[8] कां, जाय वटच्छाया ॥ २ ॥

नानासाहेबांच्या धांव्याचा परिणाम.

२५ ओंवी

चालले नानांचें धांवा नमन । जामनेरीं अति गहिंवरून ॥
कळवळलें बाबांचें अंतःकरण । भक्तराया कारणें ॥

बाबांची माधवराव देशपांडे यांना आज्ञा

२६ पद. राग—भैरवी. ( 'मूढ असा कां होसी०' या चालीवर )

द्वारिं उभा मम नाना । भाकितसे मम करुणा ॥ शामा ॥ धृ० ॥

---

१ लयाला. २ सांगतात. ३ दुसरा कोणी नाहीं. ४ लाडके. ५ भयंकर. ६ भिणार नाहीं. ७ आवडते. ८ देवतरु पारिजातक (इच्छित फल देणारा )

रोहिणी[1] जशि निशिं, निजरमणाची[2] । चातक जेंवी वारिवहाची[3] ॥
तशि उत्कंठें आरति उदीची । पाहत वाट किं सदना ॥ शामा ॥ दारीं ॥१॥
शामा लिहुनि अडकर[4] आरती । आणी सत्वर चिठ्ठ्या वरतीं ॥
घेऊनि ये तशि उदि ही परती । करि झणि बापु रवाना ॥ शामा ॥ दारीं ॥२॥

इतक्यांत बापुगीर गोसावी बाबांकडे येतात.

### २७ साकी.

इतुक्या माजी येत दर्शना बापुगिर गोसावी ॥
आशि[6], उदी, द्या, बाबा, जाण्या खानदेशीं अपुल्या गांवीं ॥
अगम्य विभुलीला । समजे कैशी मनुजाला ॥

बाबा बापुगिरास जामनेरास जाण्यास सांगतात.

### २८ दिंडी.

बरें झालें तूं जाय खानदेशीं ॥ तांतडीचें[7] मत्कार्य त्या प्रदेशीं ॥
जाइ वेगीं तूं प्रथम जामनेरीं । घेइ नानागृहीं विश्रम[8] रात्र सारी ॥

बपुगीर सबबी सांगून तिकडे न पाठविण्याण्याकरतां बाबांची प्रार्थना करतात.

### २९. पद.–( 'नच सुंदरि करुं कोपा०' या चालीवर )

नच सद्गुरु रघुराया । दवडिसी मज त्यां वाया ॥
उत्कंठा किती मज हीं । मम ग्रामीं जाया ॥ धृ० ॥
मुद्राद्वय[9] मजपाशी । असती गा हृषिकेशी ॥
पादि जाणें, उपवासी । होईल त्यां दों दिवशीं ॥
जाणशि तूं मग ऐशी । [10]हांशी कां मम करिशी ॥
रागा तूं मजवरि गा । येऊं नको सदया ॥ १ ॥ नच० ॥

बापुगीर जामनेरला जातांना वाटेंत अडचणी कशा व किती येतील त्या बाबांना पुन्हा सांगतात.

### ३० अंजनी गीत, ( राग—झिंझोटी. ताल—धुमाळी )

अग्नि [11]रथांतुनी जळ गांवासी । लागें उतरावें गुणराशी[12] ॥
जामनेर तें अठरा कोशीं । तेथुनि दूर असे ॥

---

१ चंद्राची बायको. २ चंद्राची. ( रमण=नवरा. रोहिणीचा नवरा चंद्र ) ३ मेघ. ४ कै. भक्तवर्य माधवराव अडकरांनीं केलेली बाबांची आरति. ५ समगीर गोसावी. बाबांचा भक्त ज्यास बाबा बापुगीर म्हणतात. ६ आशीर्वाद. ७ जल्दीचें, घाईचें. ८ विश्रांति विसावा. ९ रुपये. १० हंसूं. ११ आगगाडी. १२ गुणसमुद्रा.

### ३१ सदर—

चौदा आणे एक रुपाया । लागे अग्निरथासि कि राया[1] ॥
अवघे दोन आणे यदुराया । मजपाशीं उरती ॥

### ३२ स्वागता.

कोण दो[2] अणिमधी[3] मज धाडी । सांग पां झणिं तिथें रथगाडी ॥
मित्र[4] तापविल मत्पद[5] घोडीं । थंड गार मम पाडिल नाडी ॥

बापूवर रागाऊन ताबडतोब जामनेरास जाण्याची बापूला बाबा आज्ञा करतात.

### ३३ झंपा.

उठी जाय रे शीघ्र वेगीं गव्हांरा[6] । न घेई कुशंका न घे दुर्विचारा ॥ धृ० ॥
घेइ ना रे भया । करिल अल्लामिया । सोय, काया स्वदीयां[7] ।
लागुं दे नार्ति[8] वारा ॥ उठी ॥ १ ॥
दवडि पळ न साचें । घडि न दिवस वेंचें । अल्प देई न वाचे ॥
बोलण्या व्यर्थ थारा ॥ उठी ॥ २ ॥
घेइ उदि आरती । देइ नाना हातीं । वाट पाहे अती ॥
जेंवि कीं रे चकोरा ॥ उठी ॥ ३ ॥

बापुगीरानें जामनेरला जाण्याचा निश्चय करून शिरडी सोडली.

### ३४. विभावरिवृत्त.

परिसुनी वच निजाग्रह छिंदिले ॥
कुमति संभव कुतर्क हि निंदिले ॥
रुचिर आरति उदी अभिनंदिलें ॥
स्वकरिं घेउनि निघे पद वंदिलें ॥

### ३५. पृथ्वी.

समर्थपुर[9] सोडिलें, [10]विकृति-लेख ही खोडिले ॥
[11]कुशंक वन तोडिले, दुरित[12] प्रस्तरा फोडिलें ॥
[13]विकल्प पशु झोडिले, बहिर[14] प्रत्यया ओढिलें ॥
[15]अश्रद्ध तट मोडिले [16]वचनिं निश्चया जोडिलें ॥

बापूनें निश्चय केला तरी गाडींत पुन्हा शंका येऊं लागली.

---

१ भाडें. २ दोन. ३ आण्यामध्यें. ४ सूर्य. ५ माझीं पायरूप घोडीं ६ मूर्खा, वेडगळा. ७ तुझ्या शरीराला. ८ न + आर्ति=कष्ट, पीडा, दुःख ९ शिरडी. १० विकाररूप लेख. ११ वाईट शंका. १२ पातकरूपी खडक. १३ वाईट कल्पनारूपीं पशु १४ बहिः= बाहेर. अप्रत्यय=अविश्वास. १५ श्रद्धाहीनतारूपी भिंती. १६ बाबांच्या वचनावर.

### ३६. द्रुत विलंबित.

तनं[1] चले, न चले मन त्या स्थला । वसुरथीं[2], सुरथीं[3], जरि बैसला ॥
धन मिळे न मिळेल विवंचना[4] । अविसरे[5] विसरे दृढ भावना[6] ॥

जळगांव स्टेशनवर येतांच बापूला भूक लागली व निराशा झाली.

### ३७. मालिनी.

थडकलि जळगांवीं गाडि बापूगिराची । फडकलि मग स्वारी खालि चिंतातुराची ॥
न दिसत रथ घोडा, बाहिरी भाजिपोळी । जठर[7] ज्वलन[8] ज्वाला[9] अंतरीं[10] भा[11]जि पोळी[12] ॥

इतक्यांत एका तांगेवाल्यानें ललकारी मारली.

### ३८. ( 'जबका अजब तडाखाबे' या चालीवर )

शिरडी बापुगीर लाला । जामनेर जानेवाला ॥ धृ० ॥
ऐसा अदमी आया होगा ये गाडीसे कोई ।
साहिबनें येतांगा भेजा उसकू लेनेकू भाई ॥ शिरडी ॥ १ ॥
तांगा आछा, घोडा आच्छा, आच्छा हाकनेवाला ।
गादी आछा तकिया आछा, आछा बिठनेवाला ॥ शिरडी ॥ २ ॥
रहा देखके रहे है साहिब, रात दीन दो उनकी ॥
भाइ चलो रे जलदि करो रे, बात नही कहनेकी ॥ शिरडी ॥ ३ ॥

आपणच तो इसम आहों म्हणून बापुगीर सांगतात.

### ३९ साकी.

मय है अदमी वो हि शिरडिका, तपास मत कर जादा ॥
तेरे गाडिमें मय आतां हूं, जरा ठेर रे शिपाइदादा ॥
धनिकु खबर होगा । लीये भेजा ये तांगा ॥

सारथी, घोडे, रथ व भक्तराज यांचें तेज, सौंदर्य, ऐश्वर्य व भाग्य,

### ४० दिंडी

काय वर्णूं मी भाग्य त्या रथीचें ॥
भक्तरायाचें, मोल सारथीचें ॥
स्यंदनाश्वश्री तशि, जशी शारदेची ॥
शके वानूं नच गिरा शारदेची ॥

---

१ शरीर, २ वसु=अग्नि. रथ=गाडी=आगगाडी. ३ उत्तम रथांत. ४ काळजी ५ विसर नसणें. ६ दृढ निश्चय. ७ पोट. ८ अग्नि, ९ भडका. १० अंतःकरणाला ११ भाजूं लागल्या. १२ पोळूं लागल्या.

### ४१ शार्दूलविक्रीडित

इंदो[1]ज्ज्व[2]लता सुमं[3] मृदुल[4]ता, गो[5]क्षीर[6] सं गौर[7]ता ॥
सौगं[8]धोत्कटता, जं[9]वातिशयता, नक्ष[10]त्र तेजस्विता ॥
काढूनी जणुं कातले हरि[11] रथा, पाहूनि बोले रवी ॥
धिग्[12] मत्सारथि अश्व, जो मज मही[13] एके दिनीं फेरवी ॥

सारथीचा पोषाक व चेहरा.

### ४२ शार्दूलविक्रीडित

कल्लेदार मिशा, तशा बहुतशा, दाढी बडी फांकडी ॥
पल्लेदार सुबंध[14] अंगरख[15] ही ती वांकडी पागडी ॥
शिल्लेदारइजार कंबरपटा, हातीं छडी नेट[16]की ॥
शिपाई गडि झोंकदार नटला, साई जगन्नाटकी ॥

कवि उत्प्रेक्षा

### ४३ वसंततिलका

बापू[17] न, रामपददूत कपींद्र[18] लागे ।
कन्या न,[19] लक्ष्मणचि[20] पीडित[21] श[22]क्तियोगें
नोदी[23] न,आरति, अमोघ नगौष[24]धी त्यां
नोसाई, दाश[25]रथि राम न[26] मोऽस्तु मे त्या[27] ॥

बापूचा रथवेग पाहून पृथ्वी आपल्यास अभागी समजते.

### ४४ दिंडी

**बसे बापू आनंद रथीं मागें । सोडि[28] सैंधव[29] सारथी मरुड वेगें ॥**
**वाह[30]टाप न रथचक्र भूमि मार्गीं । शिवे, लाजे भू, म्हणे मी अभागी**

मार्गांत रथ उभा करून सारथी घोड्यांना पाणी पाजतो व आपणही दोघे कांह खाऊ असें बापूला सांगतो.

---

१. चंद्राचा. २ प्रकाश. ३ पुष्प. ४ मऊपणा. ५ गाय. ६ दूध. ७ अतिशय पांढरेपणा. ८ उत्तम सुवासाचा उत्तमपणा. ९ वेगाचा अतिशयपणा. १० तान्यांची चकाकी. ११ घोडे. १२ धिःकार असो. १३ पृथ्वी. १४ सुंदर बंदाचा. १५ अंगरखा. १६ सुंदर ऐटबाज. १७ बापुमीर. १८ मारुतिराज. १९ मुलगी. ( नानासाहेबांची ) २० राम सहोदर. २१ दुःखित. २२ शस्त्रघावामुळें. २३ न+उदी=नोदी. २४ द्रोणागिरी वरील २५ जानकीवल्लभ. २६ माझा नमस्कार असो. २७ त्या साइरामचंद्राला. २८ फेकी. २९ घोडे. ३० घोड्यांचीं पावलें.

४५ यूथिका.

सोडि अश्व अरुणोदयिं सारथी । घ्यावया विरम[1] ओहळिं[2] त्या पंथीं[3] ॥
" अश्वकूजल पिलाकर के जरा । खाइंगे कुच बी आप " वंदे[4] गिरा[5] ॥

४६ साकी.

आंब, मिठाई मैने लाया लड्डु बी गुळपापडिका ॥
सार्थ[6] खाइंगे, दौड[7] जाइंगे, काम बि बहोत जलदीका ॥
ओहळिं हय नेले । आपुल्यासाठि हि जल आणिलें ॥

४७ ओवी. बापूगिराची शंका, व तपास.

बोली पेहराव झोंकदार । पाहूनि शंकित रामगीर[8] ॥
म्हणे हा यवन साचार । कैसा खाऊं या संगें ॥

४८ पद.

सुनो शिपाइराव बात मेरी । कहो यार कोन जात तुमारी
पेहराव बोलि हवलदारी । दिखते तुम् यवन अकम गीरी ॥ १ ॥
मय हिंदु गुसांवि जात गीरी । चिजें[9] कैसीं खाउ तुमारी ॥ २ ॥
सारथीकडून शंकानिरसन.

४९ पद. ( ' टाकिला यानें यानें डौल पाहिला० ' या चालीवर )

भाइ मय हिंदू । क्षत्रि राजपूत । है गरवाल मेरि जात ॥
नहि म्लेंच्छ यवन । नही मुसलमीन । साब मेरा वोहि बम्हन ॥
साबनें दीया । चीज़ खानेकू । नहि हरजा तुमकु लेनेकू ॥ १ ॥ भाइ ॥
सारथ्यानें बरोबर आणिलेलें फराळाचें किती व कां गोड होतें ?

५०. प्रहर्षिणी वृत्तम्

पाथेयं मधुरतरं सुखं सुधायाः । देवानामपि दिवि दुर्लभंच सत्यम् ॥
प्रत्यक्षं शिरडि सुरेण निर्मितं यत् । तल्लब्धं स्वयितुमत्र बापु भाग्यम् ! ॥

**अर्थ**—( सारथ्याबरोबर ) जें फराळाचें होतें तें अमृतापेक्षां गोड व सुखकर होतें; आणि खरोखरच तें स्वर्गांत देवांनासुद्धां मिळणें दुर्लभ होतें; कारण तें प्रत्यक्ष शिरडीदेवानेंच बनविलें होतें. तें येथें (ह्या लोकीं) चाखावयास बापूला मिळालें हें केवढें बापूंचें भाग्य!

ही सर्व तयारी पाहून बापूचा आनंद, सारथ्याबरोबर त्याचा फराळ व जामनेरास त्याचें प्रयाण.

---

१ विश्रांति. २ नाल्यांत. ३ मार्गांत. ४ म्हणें, म्हणाला. ५ बापुगिराला. ६ बरोबर. ७ धांवत, भरधांव. ८ बापुगीर. ९ पदार्थ.

### ५१. मंदाक्रांता.

श्रुत्वा[1] चारु[2], मृदु[3], नत[4], गिरा[5], पाहुनी ती तयारी ॥
तृष्णार्तांची[6], जशि खलु सुधा[7],-सिंधु चिंता निवारी ॥
तैसें झालें, अजि ईह[8] वदे, त्या सवें ती निहारी[9] ॥
आनंदानें, करि रथि[10] बसे, जाय तो जामनेरीं ॥

सारथ्यानें बापुस गांवाबाहेर मामलतदार कचेरीजवळ सोडलें.

### ५२. साकी.

ग्रामाबाहिर कचेरि संन्निध, स्यंदन[1] सारथि सोडी ॥
बापुगीर ही उतरुनि खालीं, विश्रांती घे थोडी ॥
दाटली लघुशंका । बाजुस जाई तो एका ॥

इतक्यांत अद्भुत चमत्कार.

### ५३. शार्दूलविक्रिडित.

येतो[11] जो परतोनि काय घडलें आश्चर्य तेथें अहो ! ॥
ना तो सारथि, नाश्व[12], ना रथ, दिसे कोठें लपाले किं हो ! ॥
ना ते[13] मोलि,[14] स्वयंच साइ नट, त्या सोडी कचेरी पशी ॥
नेई सांक[15]चि विश्व[16]चोर अवघे त्या[17] कोण के[18] गींवशी[19] !!! ॥

बापू मग नानासाहेबांच्या घराचा शोध करतो.

### ५४. भुजंगप्रयात.

करी शोध नाना गृहाचा कचेरीं । निघे ग्रामीं, ठाके[20] तयांच्या अगारीं[21] ॥
उदी आरती दीधली साइदूतें[22] । किती मोद[23] नाना, किती मी वदूं[24] तें ॥

नानासाहेबाच्या आनंदाचें कविवर्णन.

टांगा व फराळाचें पाठविल्याबद्दल आनंद मानून रथ व सारथी कोठें नाहींसे झाले याबद्दल बापू आश्चर्य प्रदर्शित करतो.

### ५५. भुजंगप्रयात.

सुधा[25]नंद दे चंद्र जेंवी चकोरा । रतीं[26] नंद[27] दे मेघ जेंवी मयूरा ॥

१ ऐकून. २ सुंदर, गोड. ३ नरम. ४ नम्र, विनयशील. ५ भाषा, पाणी. ६ तान्हेनें पीडित. ७ अमृत. ८ येथें. ९ फराळ (सकाळचा). १० रथ, तांगा. ११ बापू जों परत येतो तों. १२ न+अश्व=घोडे नाहींत. १३ सारथी, रथ व घोडे १४ मोलानें किंवा भाड्यानें आणलेले नव्हते. १५ स=सहित, अंक=चिन्ह, माग. १६ जगाची चोरी करणारा= परमात्मा बाबा. १७ त्याला. १८ कोठें. १९ शोधणार. २० उभा राहिला. २१ घरीं. २२ सेवकानें. २३ आनंद. २४ सांगू, वर्णन करूं. २५ अमृत. २६ विषय २७ आनंद.

सुखानंद दे माय[1] जेंवी स्वजाता[2] । [3]निजानंद दे ब्रह्म जेंवी विरक्ता[4] ॥

नानासाहेबांनीं लागलीच गुरुरायांची आरति करून मुलीस उदी पाजली.

### ५६. ओंवी.

गुरुरायांची आरती केली । उदी पाजिता प्रसूती झाली ॥
बाला हातीं पायीं सुटलीं । झाला आनंदी आनंद. ॥

### ५७ दिंडी.

सुखें स्यंदन साहिबें धाडियेला । लाडू आंबे पेढेहि फराळाला ॥
म्हणूनि येणें झडकरीं येथ झालें । परी नकळे रथ सारथी कुठें गेले ॥

नानासाहेब बापूंचे शब्द ऐकून आपण तांगा पाठविला नाहीं. हें सर्व बाबाचें कृत्य आहे असें म्हणून दुःखी होतात.

### ५८ शार्दूलविक्रीडित.

बापूक्ती परिसूनि, अश्रु नयनीं नानांचिया लोटतीं ॥
त्यां पांथेय न गाडि धाडिलि, गुरू लीला खरी, बोलती ॥
मी गा! त्वत्पदधूलि, विश्वखनि तूं, हे कष्ट मत्कारणें ॥
केलें कां ? गुरुमाय ! दुःखि बहु मी, फेडूं कुठें हीं ऋणें[9] ॥

आपल्याकरितां बाबांना कष्ट पडले म्हणून नानासाहेबांना फार वाईट वाटतें.

### ५९ पद. ( ' व्यर्थ छळियलें० ' या चालीवर. ताल—दादरा )

कष्ट दीधले । बाबा व्यर्थ शिणविलें ॥ धृ० ॥
लाविंयले तुम्हां न्हायला । तांगा घोडा, घोडेवाला ॥
लावियले करायाला । लाडू पेढे फराळाला ॥
तें सगळें विसरुनी । क्षमा दासावरी करुनी ॥
बालिकेचें विघ्न हरुनि । अंतिं सौख्य दाविलें ॥ १ ॥ कष्ट दीधले ॥

### बालोत्प्रेक्षा व याचना.

### ६० पद ( " जाऊं नको रे " या राम जोशांच्या लावणीच्या चालीवर )

समर्थ सद्गुरु सांइ सावळा, [10]विश्वरंगभू नटू ॥
शिरडी द्वारकें बसुनि हालवी, विचित्र लीलापटू[11] ॥ धृ० ॥
गंगा जल भरि, चंदन घांसी, पैठणि सेवापटू[12] ॥

---

१ आई. २ मुलाला. ३ आत्मानंद. ४ वैराग्यशील पुरुषास. ५ सुखकारक तांगा किंवा रथ. ६ उक्ति=बोलणें. ७ फराळाचें. ८ तुझ्या पायाचा रजःकण आहे व तूं विश्वाची खाण जगत्स्वामिनी आहेस. ९ उपकाराचा भार; उपकार-कर्ज १० विश्व हीच रंगभूमि किंवा नाटकगृह, त्यांत खेळणारा नट. ११ लीलारूपि पडदा. १२ दक्ष.

नाथगृहींचा हाचि नव्हे का तो श्रीखंड्या[1] बटू खरोखर ॥ तोश्रीखंड्या बटू ॥ १ ॥ रशीद पोंचवि बेदरिं शिरिंधरि, चिंध्या[2] गुर्दि[3] लंगटू[4] ॥ दामाजीचा हाचि नव्हे कां, [5]मंगळवेढ्या विठू खरोखर ॥ मंगळवेढ्या विठू ॥ २ ॥ जामनेरीं ती पोंचवि आरति, पवित्र उदिचा घटू ॥ नानांचा हा तोचि नव्हे का स्यंदन[6] [7]सारथि, [8]तटू खरोखर । स्यंदन सारथी तटू ॥ ३ ॥ विसर पडो नच तत्सेवेचा कधिंहि जरी हा [9]खटू ॥ बाल भालें[10] धरि तत्पदिं विनवी, करि जग शुभ शेवटू[11] ॥ ४ ॥ दयाळा, करि जग शुभ शेवटू ॥ समर्थ सद्गुरु ॥

## उत्तररंग समाप्त.

आख्यान समाप्तः

### ६१ अभंग

शरण सांई चरणीं गेला । त्यानें भवबंध तोडीला ॥ धृ ॥
हाणि काळासी तो लाथा । काळ ठेवी तत्पदिं माथा ॥ १ ॥
ऐसा संतांचा अधिकार । साइ संतांचें सरकार ॥ २ ॥
करं सरकारा मूजरे । आपण चरणाचे हूजरे ॥ ३ ॥
नलगे मुक्ती गुप्त ठेवा । अन्य भक्तांना तो द्यावा ॥ ४ ॥
बाल प्रार्थी नित्य मेवा । देइ तव पद भक्ती सेवा ॥ ५ ॥ शरण ॥

### ६२. आरति श्रीसाईबाबांची.

आरती साईबाबा । सौख्य दातार जीवा । चरण रजातळीं । निज दासां विसावा भक्तां विसावा ॥ आ० ॥ जाळुनि या अनंग । स्वस्वरुपीं दंग । मुमुक्षु जना दावी । निज डोळा श्रीरंग ॥ डो ॥ आ० ॥ १ ॥ जया मनिं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना । ऐसी तुझी हि माव ॥ तु० ॥ आ० ॥ २ ॥ तुमचें नाम ध्यातां । हरे संसृती व्यथा । अगाध तव करणी । मार्ग दाविसि अनाथा ॥ दा० ॥ आ० ॥ ३ ॥ कलि युगिं अवतार । सगुण ब्रह्म साचार । अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ॥ द० ॥ आ० ॥ ४ ॥ आठां दिवसां गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पाहावया । भव-भय निवारी ॥ भ० ॥ आ० ॥ ५ ॥ माझा निज द्रव्य ठेवा । तव चरण रज सेवा । मागणें हेंचि आतां । तुम्हां देवाधि देवा ॥ आ० ॥ ६ ॥ इच्छीत दिन

---

१ श्रीखंड्या नांवाचा लहानसा सेवक. २ अति फाटलेलें पागोटें. ३ ढुंगणांत. ४ लंगोटी. ५ मंगळवेढें गांवचा. ६ टांगा. ७ टांगेवाला. ८ घोडीं. ९ खोडसाळ. १० कपाळ. ११ जगाचा चांगला शेवट कर. जगाचें कल्याण कर.

चातक । निर्मल तोय निज सुख । पाजावें माधवा । संभाळ आपुली भाक॥ आ०
॥ भा० ॥ आ० ॥ ७ ॥

### ६३. आरती श्रीज्ञानेश्वरमहाराजांची.

आरति ज्ञानराजा । महा कैवल्य तेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ धृ० ॥
लोपलें ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥ १ ॥
प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केलें ।
रामा जनार्दनी । पायीं मस्तक ठेविलें ॥ २ ॥

### ६४ आरति श्रीदत्तगुरुची.

काषायांबर खंड सुनिर्मित कौपीनम् ।
दंडकमंडलु मंडन मंडित मूर्धानम् ।
रिपु मंडल मदखंडन पंडित विज्ञानम्
योग कला कलिताखिल स्वंपद महिमानम्
जयदेव जयदेव जय यति यूथपते । मामुद्धर
नरसिंह सरस्वति विमलमते जयदेव जयदेव ॥ १ ॥
पद्मासन विजयश्री सेवित पादाग्रम् ।
अर्धोन्मीलित नयन निरीक्षित नासाग्रम् ।
प्रणवांत प्रतिपाद्य स्वानुभवैकाग्रम् ।
जगदुद्धामनि धामिनी जगदीक्षा व्यग्रम् । जयदेव जयदेव ॥ २ ॥
हरिकीर्तन समया धृत वैकुंठनिवासम् ।
पंचीकरण महावागुपदेश विलासम् ।
निजनैगम महिमामृतवंतं सिद्धासम् ।
वंदेरुक्म सुतार्चित पादुकमविनाशम् ।
जयदेव जयदेव ॥ ३ ॥

### ६५ अभंग

घालीन लोटांगण । वंदीन चरण । डोळ्यांनीं पाहिन रूप तुझें ।
प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन । भावें ओवाळिन म्हणें नामा ।

### ६६ उपजाति वृत्तम्

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करोमि यद्यत्सकलं परस्मै । नारायणा येति समर्पयामि ॥

### ६७. स्रग्विणी वृत्तम्.

अच्युतं केशवं राम नारायणाम् । कृष्ण दामोदरं वासुदेवं हरिम् ।
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभम् । जानकी नायकं रामचंद्रं भजेत् ॥

### ६८. अनुष्टुभ् वृत्तम्.

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।
हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।
श्री सच्चिदानंद सद्गुरु दत्त महाराज की जय ।
श्री सच्चिदानंद सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज की जय ।
श्री सच्चिदानंद सद्गुरु साइनाथ महाराज की जय ।
श्री सच्चिदानंद सद्गुरु सर्व साधुसंत महाराज की जय ।

श्रीगुरुदत्तार्पणमस्तु

॥ श्री साईबाबा ॥

## श्री साईबाबा शिर्डीसंस्थानचे भक्तमंडळामार्फत

### शके १८५९ ते १८६१ चे त्रैवार्षिकाकरितां संस्थान कमिटीचे सभासद निवडून आले ते—

| निवडून आलेल्या सभासदांचीं नावें. | कोणा मार्फत निवडून आले ते |
|---|---|
| १ श्रीयुत रघुवीर भास्कर पुरंदरे | आश्रयदात्यांमार्फत |
| २ ,, रामचंद्र रामकृष्ण सामंत | |
| ३ ,, श्रीधर नारायण खारकर | |
| ४ ,, रामचंद्र वासुदेव घैसास | |
| ५ श्रीमंत केशवराव गोपाळराव बुटी | तहाहयात सभासदांमार्फत |
| ६ ,, गोविंद काशीनाथ गाडगीळ | |
| ७ रावसाहेब यशवंत जनार्दन गाळवणकर | |
| ८ ह. भ. प. गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज | सामान्य सभासदांमार्फत |
| ९ श्रीयुत माधवराव बळवंत देशपांडे | |
| १० ,, *वसंतराव नारायण गोरक्षकर | |

वरील निवडून आलेले सभासद व ट्रस्टी यांच्या मिळून झालेल्या संस्थान कमिटीची पहिली सभा शिर्डी येथें दीक्षित वाड्यांत ता. १६।१०।३७ रोजीं भरल्या वेळीं निवडून आलेल्या सभासदांतून कमिटीचे कार्यवाहक निवडून आले ते—

**अध्यक्ष**—ह. भ. प. ग. द. सहस्रबुद्धे ऊर्फ दासगणू महाराज.

**खजिनदार**—श्री. रा. रा. सामंत.

**चिटणीस**— ,, श्री. ना. खारकर.

कार्यवाहकांनीं आपले दुय्यम कार्यवाहक नेमिले ते—

**दुय्यम खजिनदार**—श्री. रा. वा. घैसास.

,, **चिटणीस**— ,, र. भा. पुरंदरे.

शिर्डी, ता. १६ ऑक्टोबर १९३७

श्री. ना. खारकर
ऑ. चिटणीस,
श्रीसाईबाबा शिर्डी संस्थान कमिटी.

---

* श्री. व. ना. गोरक्षकर यांनीं पत्रद्वारें ज्या सभासदांनीं त्यांना निवडून आणिलें त्यांचे आभार मानून आपली कमिटीवर काम करण्याची इच्छा नसल्याचें कळविल्यावरून त्यांच्या पत्रांत नमूद केल्याप्रमाणें त्यांचा कमिटीच्या सभासदत्वाचा राजिनामा मंजूर करून त्यांच्या खालीं झालेल्या जागीं श्री. महादेव विष्णु सहस्रबुद्धे, एक शिर्डी येथील स्थानिक गृहस्थ, यांची कमिटीनें नेमणूक केली आहे.

श्री. ना. खारकर,
ऑ. चिटणीस,
श्री. सा. शि. सं. क.

# वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याच्या अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हास कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमच्याकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

# वार्षिक वर्गणी

वार्षिक वर्गणी टपालखर्चासह मनिऑर्डरीनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३।।, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास ।।-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला**

# लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाच्या दोन्ही बाजूंस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि व्हावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हाला कळ[illegible]शिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमच्याकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्ही घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक, **श्रीसाईलीला**

दक्षिण प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनी उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणूमहाराज यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. च. फेकर, M. A., LL. B. यांनी प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी–भावार्थ–दीपिका**

हा **नरेंद्र बुक डेपो, दादर,** मुंबई येथें मिळेल.

**कापडी प्रत १० आणे** **साधी प्रत ८ आणे,**

# सांडू ब्रदर्स

**ओरिजिनल**

# ब्राह्मी तेल

**मेंदूचे सर्व विकारांवर**

# ख र्जु रा स व

**दमा, खोकला, व क्षय यांवर**

## महारास्नादि काढा योगराजगुग्गुळ

**सर्व प्रकारचे वातविकारांवर**

**द. कृ. सांडू ब्रदर्स** आयौषधि-कारखाना. चेंबूर-मुंबई.



ह. [illegible] श्रीलक्ष्मी-नारायण छापखाना, २६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें रामचंद्र काशीनाथ तरफीस यांनी छापून रामचं[illegible] सामंत यांनी [illegible] बांद्रें (मुंबई [illegible]) येथें प्र[illegible]